# संध्या-प्रकाश

(काव्यसंग्रह)



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२८०

REFBK-0021117
REFBK-0021117

- कृ. के. राहाळकर.

# संध्या-प्रकाश

( कविता संग्रह )

: कवि :

**कृष्णाजी केशव राहाळकर**

: प्रस्तावना :

डॉ. प्रा. अरविंद वा. कुळकर्णी, M. A. Ph. D.

REFBK-0021117

REFBK-0021117

मार्च १९७६

प्रकाशक :

● कृ. के. राहाळकर,
टिळक रस्ता, अलिबाग–कुलाबा

● आवृत्ति पहिली

● वर्ष प्रतिपदा, ३१ मार्च १९७६

● किंमत रु. ३–५०

● सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक :

● कृ. भि. राऊळ,
को. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स, अलिबाग.

---

● एकमेव विक्रेते : साहित्य सहकार संघ लि०
१७२, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर, मुंबई १४.

## अर्पण-पत्रिका

माझी प्रिय भगिनी

कै. चि. गोदावरी केशव राहाळकर

( ताई राहाळकर )



हिच्या पवित्र स्मृतीस सप्रेम समर्पण

— कृ. के. राहाळकर,

अलिबाग

## प्रस्तावना

श्री. कृ. के. राहाळकर यानी कुलाबा जिल्ह्यात माध्यमिक शाळेतील एक यशस्वी शिक्षक म्हणून नाव मिळविलेले आहे. या भागातील जनमानसात त्यांची रुजलेली भूमिका 'गुरुजीं'चीच आहे. प्रस्तुत संग्रहातील कविता वाचताना वाचकाला, या कविता लिहिण्यामागील त्यांच्या कवीच्या भूमिकेतही हा 'गुरुजी'च मिसळलेला दिसेल! निर्भेळ कवीपेक्षा ही भूमिका कविगुरुजींचीच आहे.

या भूमिकेतून निर्माण होणारी काव्यविषयक बलस्थाने आणि मर्यादा या साऱ्या कवितांबाबत मग आपोआप जाणवू लागतात. सगळ्याच कवितांचा भर, विषय आखून घेणे आणि त्याचे स्पष्टीकरण करणे यावर आहे. विषयही आटोक्यात असून स्पष्टीकरणाची धाटणी सोपेपणाची आहे. या साऱ्या कवितांचा अपेक्षित रसिकवर्गही एका खास थरावरचा ठरतो.

कोकणगीत, महोत्सवगीत, सुस्वागतम् – बालगंधर्व, १५ ऑगस्ट, महाराष्ट्रभूषा बनो भारता, एक स्वागत - गीत, क्रीडा - ध्वज - गीत, या सारख्या प्रस्तुत संग्रहातील कवितांचे स्वरूप प्रासंगिक आहे. काही विशिष्ट प्रसंगांच्या निमित्ताने साधलेल्या रचना, त्यात काव्य शोधणेच चुकीचे ठरेल.

राहाळकरांची भूमिका लक्षात घेतली की मग त्यांची कविता वाचकांना काही स्वतंत्र असा काव्याचा प्रत्यय देण्यासाठी लिहिली गेलेली नाही, हेही ध्यानात येते. संध्या–प्रकाश, सृष्टि रम्य शोभते, पूर्णिमा, सुमन, वासंतिक उषा, कोकिलेस, कुमुदिनी, अरुणप्रभा, अरुणगान, प्रभात-वर्णन इ. बऱ्याच कवितांतून ते निसर्गाची चित्रणे साधतात. या साऱ्याच ठिकाणी त्यांचा भर वर्णनपरतेवर आहे. निसर्गाची ही सारी वर्णनेही सांकेतिकच आहेत, पण त्यांच्या निवेदन पध्दतीतील प्रांजळपणा आणि सरळपणा हृद्य आहे. अशा अनेक सांकेतिक कवितांत सुध्दा संकेत लपविण्याची चतुराई काही कवी करतात, तसा प्रकार राहाळकरांच्या कवितेत नाही. हा माणूस, कसलेही

हातचे न राखता, कसलाही आव न आणता कविता उभी करतो हे त्यांची कविता वाचताना सारखे जाणवत जाते.

लो. टिळक, आगरकर, म. गांधी, रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी यासारख्या लोकोत्तर भारतीयांवर त्यानी लिहिलेल्या कविता अशाच उल्लेखनीय आहेत, यातसुध्दा, या लोकांच्या कार्यासंबंधीचे स्वतंत्र चिंतन काव्यात्म पातळीवर चढलेले आहे असे नाही, पण राहाळकरानी या लोकांची स्तुतिगीते गाताना त्यांच्या 'कवि - गुरुजी' या भूमिकेशी योग्य इमान राखलेले आहे. खरे तर शाळांच्या अभ्यासक्रमासाठी तयार केल्या जाणाऱ्या क्रमिक पुस्तकांत अशा कवितांची योजना व्हायला हवी.

राहाळकरांची सारीच कविता कसलाही झगझगाट नसलेली, मंद प्रकृतीची आहे. तिच्यात तशी वेधकताही नसेल. पण तिची जीवनावर, जीवनातल्या पावित्र्यावर व मांगल्यावर श्रध्दा आहे. या जीवनाला त्रासणाऱ्या युध्दादी गोष्टींचा तिला तिटकारा आहे. ज्या काळात राहाळकरांनी कविता लिहिली त्या काळात समाजाला प्रतिगामी, स्वत:योग्य नसलेंली काही संस्था कल्पून टीकेची झोड उठविणे ही एक फॅशनच बनलेंली होती. कडवट सूर आळवीत बसणे हे कवींचे काम झाले होते ! या कालजन्य गुणधर्माला राहाळकरांची कविता बळी पडलेली नाही. तात्त्विक बैठकीचे बांधकाम तिला जमले नसेल, पण तिचा सूर आशावादी आहे.

राहाळकरांच्या एका वैशिष्टयाचा उल्लेख मात्र करायलाच हवा. कवितेच्या रचनेतील घोटीव सफाई हे वैशिष्टय. त्यांची कोणतीही कविता वाचताना शब्दांची ओढाताण करावी लागत नाही. एकदा पकडलेंला ताल ते शेवटपर्यंत व्यवस्थित पणे सांभाळू शकतात. व्याकरणाच्या चुका, अपरिचित संदर्भ, क्लिष्टता या सारख्या दोषांपासूनही ही कविता अलिप्त आहे.

अलिबागेसारख्या आडवाटेच्या ठिकाणी राहून राहाळकरानी केलेली ही रचना खरोखरच अभिनंदनीय आहे.

अलिबाग,<br>१५-३-७६

— अ. वा. कुळकर्णी

## संध्या--प्रकाशाच्या छायेत

विद्यार्थीदशेपासूनच इतर लेखनाप्रमाणे कविता करण्याचाही छंद जडला. त्या वेळी लिहिलेल्या कविता शाळेच्या नियतकालिकात प्रसिध्द होत. शाळेच्या गणेशोत्सवांत मेळ्यासाठी पद्ये, विद्यार्थीदशेत आणि शिक्षक झाल्या-नंतरही माझ्याकडून रचली गेली. शाळेच्या स्नेहसंमेलनांत होणारी नाटके, गद्य असली तर संगीत करण्यासाठी आणि संगीत असली तरी त्यांत विद्यार्थ्यांना म्हणता येण्याजोगी नवी पदे रचण्याचे व ती बसवून घेण्याचे कामही करावे लागे. या कामांतून काव्य रचनेचा छंद वाढीस लागला. नंतर बरीच काव्य रचना झाली, त्यांतील कांही काव्येंच या संग्रहांत घेतली आहेत.

या संग्रहात आलेल्या बऱ्याच कविता, ‘ गृहलक्ष्मी ’, ‘ बालवीर ’, ‘ दीपलक्ष्मी ’, ‘ कुलाबा जनराज्य ’, को. ए. सोसायटीचे ‘ विकास ’, ‘ श्री कनकेश्वर ’, ‘ बालसन्मित्र ’ इत्यादी नियतकालिकांतून आणि स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिध्द झालेल्या आहेत. कोठेही प्रकाशित न झालेल्या अशाही काही कविता आहेत.

या संग्रहात याव्यात अशी इच्छा असूनही येऊ शकल्या नाहीत अशा काही कवितांचा उल्लेख करावयास हवा. विद्यार्थीदशेतील एक कविता, लोकमान्य टिळकांवरील, “ स्वातंत्र्य युध्द लढण्या, बलवंत जन्म होई ” ही त्या वेळी एका वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली, बालवीर असताना, ‘ हा हिंद देश माझा ’ या चालीवर लिहिलेली “ महाराष्ट्र देश माझा ” (ही पण त्या वेळीं ‘ बालवीर ’ मासिकांत प्रसिध्द झाली होतीच), तसेच २६ जानेवारी १९५० या ऐतिहासिक आनंददायी शुभदिनानिमित्त रचलेली आणि त्या दिवशीच्या मुख्य सरकारी समारंभात म्हटली गेलेली, “ सुस्वागतम्, लोकसत्ताक दिन हा, भाग्ये महा भारता लाभला, ” ही व आणखी कांही कविता प्रयत्न करूनही उपलब्ध होऊ शकल्या नाहीत ! या संग्रहात त्या देता आल्या असत्या तर मला आनंद व समाधान वाटले असते.

मी ज्या शाळेत शिक्षक म्हणून काम केले त्या इंडस्ट्रियल हायस्कूलला, पायाभरणी, इमारतीचे उद्‌घाटन, औद्योगिक शाळेचे उद्‌घाटन अशा विविध शुभ प्रसंगी मुंबई प्रांताचे गव्हर्नर्स, सावंतवाडीचें राजेसाहेब, राज्याचे मंत्री असे थोर पाहुणे लाभत गेले. त्या त्या प्रसंगी खास स्वागतपर पद्ये रचली व म्हटली गेली. ती छापून वाटण्यांतही आली. महिला संमेलन, सरकारी नोकर संमेलन, सहकार परिषदा, कुस्तीगीर परिषद, क्रीडामहोत्सव, कांही थोरामोठ्यांचे सत्कार, गौरव समारंभ, धरण उद्‌घाटन अशा अनेक प्रसंगी, व्यक्तीनामे, स्थानमहात्म्य, वैशिष्टय, गुणवर्णन, वगैरे वर्णनांची अपेक्षा असणारी पद्यें बरीच लिहिली गेली ! कांही प्रसंगी ही पद्ये छापून वाटण्यांतही येत. नमुने म्हणून, धरमतर पुलाचे उद्‌घाटन ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते झाले, त्यासाठी मुद्दाम रचलेले व म्हटलेले गीत (जे त्या वेळीही छापून प्रसृत करण्यात आले होते ) जिल्ह्यांतील एका महत्त्वाच्या घटनेवेळचे म्हणून, आणि एक क्रीडाध्वजगीत, परिशिष्टांत दिली आहेत. कोकण शिक्षण संस्थेचे गीत, औद्योगिक विद्यालयासाठी लिहिलेलें प्रार्थना पद्य (जे कांही वर्षें वर्ग सुरू होण्यापूर्वी म्हटले जात असे) पूर्वी अनेकदा छापली गेली असल्यामुळे या संग्रहात दिली नाहीत.

मंगलाष्टके – ज्यांत वधुवरांची, कुळांची नावे, कुलदेव प्रार्थना, आशीर्वाद वगैरे असावयाची – बरीच लिहिली गेली ! (नातलग व मित्र-मंडळी यांचेसाठी. यांतील बरीच त्या त्या वेळी छापून वाटलीही गेली आहेत,) तीही अर्थात्‌च या संग्रहात नाहीत !

एका गोष्टीचा उल्लेख येथे करावयासच हवा. माझी भगिनी कै. चि. गोदावरी केशव राहाळकर हिच्या व माझ्या कवितांचा एकत्र संग्रह प्रसिध्द करण्याचे ठरले होते. अनेक अडचणींनी ते शक्य झाले नाही ! तिच्या कवितांचा स्वतंत्र संग्रह १९७४ साली " **गीत-कुसुमांजली** " या नांवाने अक्षय तृतीयेस प्रसिध्द केला. तिने तिच्या शाळेसाठी लिहिलेले " विद्यालय-गीत " (जे पूर्वी ' हळदवणेकर कन्याशाळा ' या शाळेत प्रार्थना पद्य म्हणून

म्हटले जात असे,) त्यांत घातले नव्हते, त्याचा समावेश या माझ्या संग्रहांत केला आहे. माझा हा लहानसा कविता संग्रह तिच्याच पवित्र स्मृतीस अर्पण केला आहे.

अलिबाग येथील महाविद्यालयांतील मराठीचे नामवंत प्राध्यापक डॉ. अरविंद वा. कुळकर्णी, M.A. Ph.D यांनी कविता वाचून, वेळांत वेळ काढून (परीक्षा, पेपर्स, स्वतःचे पुस्तक प्रकाशन वगैरेची गर्दी असतानाही) प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. त्यांनीच येथील **मित्राक्ष** मासिकाच्या दिवाळी १९७४ अंकासाठी घेतलेली माझी मुलाखतही त्यांच्या सूचनेवरून या पुस्तकात परिशिष्ट रूपाने दिली आहे. ती छापण्यास संमती दिल्याबद्दल मी संपादकांचा आभारी आहे. छापखान्याचे व्यवस्थापक, माझे मित्र श्री. कृ. भि. राऊळ, त्यांचे सहकारी श्री. अनंतराव ठाकूर यांचा मी आभारी आहे. त्यांच्या आपलेपणाच्या प्रयत्नानेच हा कवितासंग्रह प्रकाशात येत आहे. छापखान्यांतील सर्व कर्मचाऱ्यांचेही आभार मानणे अवश्य आहे. त्यांनीही विशेष तसदी घेतली आहे.

माझी ही अल्प स्वल्प साहित्यसेवा जनताजनार्दनाने गोड मानून घ्यावी एवढीच नम्र विनंती आहे.

**वर्ष प्रतिपदा, (गुढी पाडवा)**

अलिबाग, दि. ३१-३-७६

कृ. के. राहाळकर

# कवितानुक्रम


| क्रमांक | पृष्ठ |
|---|---|
| १ श्रीगणेश पूजु या | ९ |
| २ शारदा वंदन | ९ |
| ३ संध्या–प्रकाश | १० |
| ४ कोकण गीत | १२ |
| ५ श्रीकनकेश्वराची आरती | १४ |
| ६ महोत्सव गीत | १५ |
| ७ या या गुरुजी | १६ |
| ८ टिकेल का जगताची सुषमा! | १७ |
| ९ देव नाही मंदिरी | १९ |
| १० सायंकाळी, भलत्या वेळी | २० |
| ११ सुपथ आचरा | २१ |
| १२ हिरेजडीत पाळणा | २२ |
| १३ हिमाचलाची पाठराखणी करण्या सह्याचल सजला | २३ |
| १४ भारत–कन्या | २४ |
| १५ कै. गो. ग. आगरकर | २५ |
| १६ सुस्वागतम्, बालगंधर्व | २६ |
| १७ कुलाब्याचे दे. भ. माधवराव गोसावी | २७ |
| १८ १५ ऑगष्ट | २८ |
| १९ कै. दे. भ. रामभाऊ मंडलीक | २९ |
| २० सौख्य-चंद्र उगवु दे | ३० |
| २१ रवींद्र | ३१ |
| २२ तिलक–स्मृति | ३२ |
| २३ महाराष्ट्र भूषा बनो भारता | ३३ |
| २४ महात्माजींस शतशः प्रणाम | ३४ |
| २५ कुलाबा किल्ल्यास | ३५ |
| २६ चिरनेर मिनार | ३६ |
| २७ सेनानी तात्या टोपे | ३७ |
| २८ संयुक्त राष्ट्र संघ | ३९ |
| २९ क्रमू सहकार पथाला | ४० |
| ३० सृष्टि रम्य शोभते | ४१ |
| ३१ पूर्णिमा | ४१ |
| ३२ सुमन | ४२ |
| ३३ वासंतिक उषा | ४३ |
| ३४ कोकिलेस | ४३ |
| ३५ शांतता | ४४ |
| ३६ कुमुदिनी | ४५ |
| ३७ अरुण–प्रभा | ४६ |
| ३८ अरुण–गान | ४७ |
| ३९ प्रभात–वर्णन | ४८ |
| ४० उल्का | ४९ |
| ४१ सौदामिनी | ५० |
| ४२ इंद्रधनू | ५० |
| ४३ गगनात | ५१ |
| ४४ रायगडास | ५२ |
| ४५ संध्या | ५३ |
| ४६ तारकेप्रत | ५४ |
| ४७ विद्यालय–गीत | ५५ |
| ४८ शरद | ५६ |
| ४९ मृत्यु | ५७ |
| ५० एक स्वागत गीत | ५८ |
| ५१ आजची दिवाळी | ५९ |
| ५२ क्रीडा-ध्वज-गीत | ६० |

## श्रीगणेश पूजु या

या सकलही या चला, गुंफू गीत मालिका,
पदकमलीं वाहूं या, श्रीगणेश पूजुं या ॥ धृ०॥
ये बहार भक्तीचा, वंदु देव बुद्धिचा,
नीति–धैर्य–संपदा, मिळो सदा सुखास्पदा,
रामराज्य होऊं दे, तत्पदांस प्रार्थुं या ॥१॥
दुष्ट बुद्धि नष्टवी, मधुर भाव उपजवी
स्वार्थ दंभ नच शिवो, जनमनांस ते कधीं,
मंगलमय जग होवो, नित्य हेच मागुं या ॥२॥

---

## शारदा-वंदन

देवि शारदे, चरणा नमितो।
स्तवन तुला कवनीं गातो ॥ धृ० ॥
काव्य–कमल हे हृद–सरीं ठेले,
तव कृपेनें विकसित झाले,
प्रेम–सुगंधा विखरित मोदे,
सुहृद–भृंग मम सेवो तो ॥ १ ॥

---

२२८० २१११८ ७।०१

(चाल :— ती पहा, ती पहा............)

चालला, चालला, त्रस्तला भानु गृहाला ॥ धृ०॥

उदयगिरिवरती उदेला,
खग, खगां आनंददाता,
काव्य-सुमनी, अरुण-सूक्तीं
द्विजगणीं मंत्रें स्तवीला ॥१॥

भाग्यकाली भानु आला,
भ्रांतला, संतप्त झाला,
खेळणाऱ्या स्थिरचराला,
धाक द्याया सिद्धला ॥२॥

बहरलेल्या वृक्षराजी,
कोमल्या, वेली विलासी,
ताप देई, अग्नि वर्षे,
अवकळा येई धरेला ! ॥३॥

दिनभरी निजकार्यी रतला,
शाप वा आशीर्वचाला
मानि ना, बहु श्रांत झाला
ये गृहीं अस्ताचलाला ॥४॥

गांजल्या जलवाहिनींना,
कामगारां, कृषिवलांना,
सेविती भूमाय त्यांना,
सुखद मुक्तीकाल आला ।।५।।

पाहुनिया प्रियकराला
पश्चिमा ये स्वागताला,
सागराच्या लहरीमाला
अर्पि ती संध्या तयाला ।।६।।

मानसी संतोष आशा
उपजली, गेली निराशा,
सांध्यदेवीच्या कपोळीं
स्मितप्रभा, खुलवी नभाला ।।७।।

पसरला संध्या-प्रकाश,
वात विहरे सावकाश,
जलधि गाई मंजु गीत,
वितरतो शशि शांततेला ।।८।।

---

# कोंकण–गीत

(चाल : " बहु असोत सुंदर संपन्न की महा । "
या महाराष्ट्र गीताची.)

कोकणचा प्रांत असे प्रथित भारतीं,
कीर्तिकिरण दूरवरी दीप्ति दाविती ॥धृ०॥

परशुरामनिर्मित भू–भाग कोंकण
घडवी पौराणिक पुरुषार्थ दर्शन,
अर्थ न जरी धर्म, काम, मोक्ष साधिती,
ज्ञानधनें इतर धनां तुच्छ मानिती,
शौर्याने, त्यागाने भाग्य घडविती ॥१॥

विविध वृक्षराजींची संपदा जिथें,
ठायीं ठायीं ठाकतात देव–दैवतें,
सरस्वती देवि मुदें मुक्त विहरते,
विद्यार्जनिं रमताती विद्वज्जन ते,
परंपरा थोरांची नित्य निर्मिती ॥२॥

जलयुद्धीं जलचर पाश्चात्य पळविले
युद्धतंत्र जेथिल इतिहासीं गाजलें,
भारत स्वातंत्र्यास्तव प्राण अर्पिले,
त्यागमूर्ति शूरवीर जेथ जन्मले,
शांतिचाही जगता संदेश सांगती ॥३॥

साहित्यिक थोर, संत, वेदमूर्ति ते
आयुर्वेद, ज्योतिषशास्त्रात जाणते,
गान, नाट्य, अभिनयादि शास्त्र-कलांना
जोपासुनि भूषविती राष्ट्रजीवना,
संस्कृत पंडीत भारतीं विराजती ॥४॥

सागर, सह्याद्रि द्वारपाल तिष्ठती
रक्षित इतिहास, कला, धर्म, संस्कृती,
रायगडीं शिवप्रभूची जागती स्मृती,
विजयी जलदुर्ग जागजागीं शोभती,
बुद्धिमान मुत्सद्दी जगीं गाजती ॥५॥

सह्यगिरी स्वाभिमान शिकवि जनमना,
सागरही दावि दिव्य भव्य जीवना,
कृषिवल, सामुद्रिकही नित्य राबती,
कष्टाळू, कणखर, स्त्रीपुरुष नांदती
मायभूस सेवाया आयु अर्पिती ॥६॥

---

[ अलिबाग येथील "जे. एस्. एम्. कॉलेज"च्या उद्घाटन प्रसंगी–दि. २०–६–१९६१ रोजी–म्हटलेले गीत. ]

# श्रीकनकेश्वराची आरती

जयदेवा, महादेवा, श्रीकनकेश्वरा,
आरती ओवाळू तुज जगदाधारा ।।धृ०।।

व्याघ्रचर्मी वेष्टीत तनु, कर्पुरगौरा,
नागांची भूषणें चंद्रशेखरा,
शांतरूपें सेवा भक्तांची घेसी,
संसारतापांतुनि मुक्त त्या करिसी ।।१।।

एकांतवासाची आवड मानसीं,
दीनांच्या कल्याणा देवळीं येशी,
लिंगरूपें भक्तगण तारायासी,
गणपति, गिरिजा यांसह सुखे राहसी ।।२।।

विश्वकल्याणास्तव विष प्राशियलें,
सुर, मुनि, मानव प्राणी भयमुक्त झाले,
जगदुद्धारासाठीं दैत्य मर्दीले,
त्रिपुरारी, विश्वंभर नाम गाजले ।।३।।

वृषभवाहना पार्वतिपति गंगाधरा,
कनकगिरीवर वसशी गौरीशंकरा,
दर्शन देऊनि होसी त्राता मनुजांना,
केशवनंदन करितो कनकेश्वर नमना ।।४।।

---

# महोत्सव गीत

**अलिबाग प्राथमिक शाळा,**
**शतसांवत्सरिक महोत्सव, शत-सुमनांजली**

शत-सुमनांजली वाहुं चला, ही स्तुति-सुमनांजलि वाहु चला,
शाला-माता-शुभ-पदकमला ॥ धृ० ॥

अलीबाग शहरींची शाळा
विद्यादानीं लावि जिव्हाळा
शिष्य गुरू जिथे रमती, तिला ही
शत-सुमनांजलि वाहु चला ॥ १ ॥

वर्षे शंभर आयु लाभली
ज्ञानदान नित करित राहिली
जीवनपथ नव दावि, तिला ही
शत-सुमनांजलि वाहु चला ॥ २ ॥

सरस्वतीचे शुभदा मंदिर
स्फूर्ति, धृति दे, उजळी अंतर,
सद्भावाते निर्मि, तिला ही
शत-सुमनांजली वाहु चला ॥ ३ ॥

विद्यादायिनी विद्या वितरी
विज्ञानादी विषयहि शिकवी
विविध कलांना देई, तिला ही
शत-सुमनांजलि वाहु चला ॥ ४ ॥

सुदिन शताब्दि–उत्सव वत्सर,
विद्यार्थी जे शिकले आजवर,
नमिती शाला माय, तिला ही
शत-सुमनांजलि वाहु चला ॥ ५ ॥

नवे, जुने विद्यार्थी जमले,
प्रभुचरणीं प्रार्थाया सजले,
चिरंजीविनी होवो शाला,
शत–सुमनांजलि वाहु चला ॥ ६ ॥

१५–४–६१

---

## या या गुरुजी

### [ पूज्य साने गुरुजीस ]

या या गुरुजी, रमवीत वाला,
वितरित वाक् प्रतिभा,
तरुण मनें हीं वाट पहाती
स्फूर्ति द्याया या ॥ धृ०॥

ध्येय साधले स्वतंत्रतेंचे
स्वराज्य व्हावे लोकशाहीचे
धडे द्यावया त्याग–वृत्तीचे
मार्गा दावा या ॥१॥

अमर जहाली, श्याम–कहाणी
प्रेम आईचे मधु-संजीवनी,
सेवा, समतावृत्ती गुणांची
किमया सांगाया ॥२॥

---

# टिकेल का जगताची सुषमा ?

विचार उठती मनात अवखळ
उच्चारांवर येत नियंत्रण
आवेगाचा आवरे न भर
थांबू पाहे हृदयस्पंदन ॥ १ ॥

अंबरातुनी असंख्य धारा
मेघ ओतिती भूवर अविरत
शांत जाहले सारे स्थिरचर
धगधगते परी माझे अंतर ! ॥ २ ॥

उफाळती जलधीवर लाटा
स्वैरपणाने नाचत खेळत,
साथ तयांना वायूलहरी
एकजुटीने देती गर्जत ॥ ३ ॥

स्वतंत्रता मद्भावनांस ना
देहबंधनी अडकुनि पडती,
आचारावर टाकिती बंधन
धर्म, संस्कृती, समाज जीवन ॥ ४ ॥

सुविचारांचे, कुविचारांचे
द्वंद्व जगी या अखंड चाले,
अणुशक्तिने विनाश घडतो,
नव निर्माणही येई साधता ॥ ५ ॥

विचारांवरी करिती आक्रमण
विकार, घडविती काही भीषण,
लढा जगी हा सतत चालतो
मनुज मानसा नित्य सतावित ॥ ६ ॥

चंद्रावरती पोहोचे मानव,
मंगळ शुक्रावरी आरोहण
करूच लवकर अशी मनीषा
विज्ञान–महर्षी बाळगती ॥ ७ ॥

विज्ञानाची प्रचंड प्रगती
रोधु न शके निसर्ग- नियमा,
मानवतेला मिळती धक्के,
टिकेल का जगताची सुषमा ? ॥ ८ ॥

# देव नाही मंदिरी !

नित्य कानीं शब्द येती, " देव आहे मंदिरी, "
अंतरात्मा साद देई– " देव नाही मंदिरी ! " ॥१॥

गोपुरे देवालयांची, शिल्प रचना भव्य त्यांची,
सत्य कैसे मानणें मग, देव नाही मंदिरी ? ॥२॥

घडविलेल्या दिव्य मूर्ती, विविध परीच्या शोभताती,
दृश्य मोहक पाहतो परी, देव नाही मंदिरी ! ॥३॥

घोष मंत्रांचा निनादे, नाद गाभाऱ्यांत कोंदे,
हृदयी परी पडसाद येई, देव नाही मंदिरी ! ॥४॥

भक्त पूजी भक्तिभावे, द्रव्य वांछी तो पुजारी,
भावनेला भाव नाही, देव का त्या मंदिरी ? ॥५॥

दया, त्याग वृत्ती जेथे, राहतो तो देव तेथे,
स्वार्थ दंभाच्या परिसरी, देव ना त्या मंदिरी ! ॥६॥

कामकरी कामांत रमती, शेतकरी शेतांत श्रमती,
राहतो त्यांच्याच संगे देव, तो नच मंदिरी ! ॥७॥

देव तो सद्‌भावनेत, आणि आहे सत्कृतींत,
देव सज्जन अंतरी, देव नाही मंदिरी ! ॥८॥

गांजल्या, दुःखी जनांना, दीन पतिता साह्य करण्या,
झटती तेथें देव आहे, देव नाही मंदिरीं ! ॥९॥

जेथ मानवता विराजे, आणि सुचिता वृत्ति साजे
देव त्या हृन्मंदिरी आहे, न राहे मंदिरीं ! ॥१०॥

---

# सायंकाळी, भलत्या वेळीं

सायंकाळी, भलत्या वेळी,
येशी माझ्या दारी,
उत्साह नच मनीं, शरीरीं,
जा आतां माघारी ॥ १ ॥

बालपणींच्या सुखद संभ्रमी
तरुणपणीच्या तेज रणांगणीं,
येतासी, घडत्या काही कृती,
जा आता माघारी ॥ २ ॥

संध्या सुचवी रजनी पुढे ही,
असेल चांदणी, काळोखीही !
नसे निश्चिती वातावरणीं,
जा आता माघारी ॥ ३ ॥

शिणले मानस, तनुही शिणली,
निसर्गनियमापुढती नमली,
आशा, आकांक्षा कांही नुरली,
जा आता माघारी ॥ ४ ॥

# सुपथ आचरा

निसर्गाने निर्मियेले नितांत
शुद्ध रमणीयही जगत् हे प्रशांत,
सौख्य, समृद्धी मानवा लाभण्याचा
हाच हेतू त्या जगन्नियंत्याचा ॥ १ ॥

नियम त्याचे पाळील प्राणिमात्र
सहज होईल तो ईशकृपापात्र.
मार्ग सोडुनिया जाती परी कोणी
दैन्य, दुःखाना निमंत्रून आणी ! ॥ २ ॥

पुढे नियती उन्मार्गगामी, दावी
कुपथ, मनुजा चालण्या तीच लावी,
द्वंद्व खेळती नित सुष्ट-दुष्ट वृत्ती,
वागवावे हे सत्य सदा चित्ती ॥ ३ ॥

जगी नांदावी शांतता, समृद्धी,
मानवाच्या मनीं निर्मू द सुबुद्धी
असे आशीर्वच लाभण्या जगाला
सुपथ आचरा, नेईल उन्नतीला ॥४॥

दि. २९-१०-६६

# हिरेजडित पाळणा

(चाल–श्रावणका महीना...)

हिरेजडित पाळणा, मोतियांचा दोर,
माय यशोदा जोजवी, नंदाचा किशोर ।।धृ०।।

अष्टमीची रात आणि श्रावण महिना,
भार धरणीचा उतराया जन्म घेई कान्हा,
आज गोकुळी अवतरे, दही-लोणी चोर,
माय यशोदा...।।१।।

प्रगटला व्रजी बाळ नंदाच्या घरात,
शामसुंदराची माता दृष्ट ही काढीत
सोळा कळा नाचताती, राधा–चित्त-चोर ।।२।।

शीतल चंद्रमा आकाशात डोले,
व्रजामधे कृष्णचंद्र पाळण्यात खेळे,
गोपगोपींचे नयन, तृप्त जणु चकोर ।।३।।

आज गोकुळात नांदे सर्वत्र आनंद,
नंद यशोदामातेसी होय परमानंद,
चिरंजीव होवो हरी, यमुनेस येई भर ।।४।।

(एका गुजराती गीतावरून)

# हिमाचलाची पाठराखणी
## करण्या सह्याचल सजला

आला, आला, मायभूवरी कृतघ्न शत्रूचा घाला,
यशवंताच्या नेतृत्वाने निवारण्या भारत उठला !

भारतभू ही नित्य गाजली, शांतीदेवता जगांतरी,
गांजाया तिज आज सज्जली चिनांतली शक्ती असुरी !

चेचाया चिनी असुर, बांधला चंग जवाहरलालांनी
तनमनधन अर्पण्या सिद्ध हो जनता देशप्रेमानी,

जिथें गाइली श्रीकृष्णानें गीता, तुलना नच अन्य,
निश्चित होईल भारत विजयी, होइल तो जगतीं धन्य,

परसत्तेला परतविलें अन् स्वराज्य आणिलें शिवबाने,
इतिहासांतील सुवर्णपानें लिहिली या महाराष्ट्राने.

मुत्सद्दी, सैनिक, सेनानी, संत, देशसेवक थोर,
समाजसेवक, साहित्यिकहि, महाराष्ट्रीं झाले फार.

भारतभूच्या सेवाधर्मी बद्ध-हस्त नित महाराष्ट्र,
चिनी चेटका गाडीलच हें विजयवंत हिंदी राष्ट्र !

संकट कालीं साद आली, पडसाद भेदिती गगनाला,
हिमाचलाची पाठराखणी करण्या सह्याचल सजला !

---

# भारत कन्या

धन-लक्ष्मींची वाण पडे परी गुण-लक्ष्मींना उणें नसे,
भारत आपुला अखंड विलसे, गुणांस जगती जोड नसे ॥ धृ. ॥

परसत्ता ये भारतभूवरी, दूर करण्या जनता सजली
चमकली लक्ष्मी झांशीवाली, शौर्यगुणांनीं अमर ठरे ॥ १ ॥

पाश्चात्यांना मोहिनी घाली, कवयित्री तरुलता जाहली,
भारत-संस्कृति आदर्शाचा, सद्गुण-गंधहि जगी वितरे ॥ २ ॥

विणा दास नी असंख्य तरुणी, गमल्या शौर्याच्या जणु खाणी,
परसत्तेला धडकी भरली, क्रांति-देवी भारती विहरे ॥ ३ ॥

हिंद-कोकिला सरोजिनीने, राज्यपालपद भूषविले,
महात्माजींनी उपमा दिधली, संत मिरेची सार्थ ठरे ॥ ४ ॥

घोषगर्जना स्वातंत्र्याचो, हांक ऐकिली नेताजींचो,
लक्ष्मी पुढारी स्त्री-सैन्याची, इतिहासाची स्मृति बहरे ॥ ५ ॥

विजयालक्ष्मी खरी विजयिनी, भारतभूची वकीली करुनी
परराष्ट्रांना चमक दाविली, भारत-कन्या श्रेष्ठ असे ॥ ६ ॥

वाही प्रियदर्शिनी इंदिरा भारत-राज्य-धुरा सुयशे,
भरतखंड गाजतो त्रिखंडी, कीर्तीध्वज नित फडकतसे ॥ ७ ॥

निज कर्तृत्वें भारतरमणी, सेवा अर्पिती माय-भू-चरणीं,
वर्णन करण्या स्फूर्ति कवीची, काव्य-कृतीही अपुरी पडे ॥ ८ ॥

ऑगस्ट, १९७५

# कै. गो. ग. आगरकर

## समाजसुधारकाग्रणी

केला त्याग खरा, स्वहीत कधिही चित्तांत ना आणिले,
सेवावृत्ति स्विकारुनी वरियलें दारिद्रय तेजोबळे,
रोगी, जर्जरही, तरी स्मित–मुखीं मूर्ती तुझी सोज्वळ
नेत्रांना न दिसे, परी उमजतें तूझी कृती उज्वल ॥ १ ॥

होते आगर बुद्धिचें तव शिरीं, पाहून अन्याय जे,
सांगाया सजले तुझे कर जनां, "केलेच हे पाहिजे!"
केले सार्थ स्वनाम "आगरकर ऽ" गोपाळ तू शोभला
रूढी-राक्षस-नाश-मार्गहि महाराष्ट्रास या दाविला ॥ २ ॥

क्षोभे आणि द्रवे असे हृदयही होते तुला लाभले,
मोठे कार्य करावया तळमळें, ध्येया महा ठेवलें,
"साधी राहणि अन् विचार सरणी उच्च" स्वयें पाळुनी,
लोकां सांगुनि तत्त्व थोर, गुरुजी, झालास लोकाग्रणी ॥ ३ ॥

संदेशा नव देत संतत तुझी वाणी जनां राहिली,
रूढी नष्टविण्या 'सुधारक' करी तल्वार ही घेतली.
"बोलानें न कुणी सुधारक बने, हो शिक्षणानेच वा
होई आचरणेंच," सत्य घडलें, सांगे जमाना नवा ॥ ४ ॥

---

# सुस्वागतम् , बालगंधर्व

[ अलिबाग संगीत समाजातर्फे झालेल्या नटसम्राट बालगंधर्व यांच्या सत्कार समारंभाच्या निमित्ताने –]

[ मिश्र मंदारमाला ]

सुस्वागतम्, बालगंधर्व, देवा कलाशास्त्र--सेवाव्रतें पुजिलें,
तुझ्या गानरूपाभिनयांतल्या वाक्सुधा-माधुरीनें जनां मोहिले.
साक्षात् उभी राहिली रंगदेवी, मराठीचिया रंगभूमीवरी,
तुवा अर्पिले वैभव राजशाही, खुले नाट्यसृष्टी बहु गोजिरी.

तुला लाभली श्रेष्ठता, मान्यताही, तसे योग्य गंधर्व हे नावही
मिळे, लोकमान्यांसही मान्य झाली तुझी थोरवी अन् तुझी गायकी.
खरे लागले वेड रसिकांस साऱ्या, महाराष्ट्रभूच्या सुपुत्रा तुझे,
तुवां सेविले त्यांसही आदराने, कलावंत वृत्ति तुझी ही दिसे.

असे राजहंसा तुझे नांव सार्थ, सुहृद-मानसांच्या सरीं सारसीं,
तुला लाभली मौक्तिकें आदराचीं, स्तुती, भक्तीची, कौतुकाची तशी.
मुखे वाहुं दे भक्तिरस ओघ, देवो तुला देव दीर्घायुरारोग्यही,
करायास सेवा जनांची, कलेची, असे प्रार्थना आमुची आजही. ॥

अलिबाग, २७-३-५४.

# कुलाब्याचे दे. भ. माधवराव गोसावी

[ वृत्त :- मंदारमाला ]

सत्कार प्रेमें करू देशभक्ता
जयें देशसेवा व्रता घेतले,
मुदें सोशिले कष्ट कारागृहाचे,
गृहाचे न वा पाशही मानले.

मनीं सत्य-प्रीती सदा बाणलेली
तशी त्याग-वृत्ती कृती दाविली,
असे लोकसेवा खरी ईशसेवा,
मनीं मानुनी मायभू सेविली.

गुरु लोकमान्यांस अन् गांधिजींना
तुवां मानिले राष्ट्रकार्यातुनी,
बहुतापरी सेविली मायभूमी
स्तुती वा विरोधास ना मानुनी,

तुझे नाम गोसावी हें सार्थ झाले
न भोगीयले मान सन्मानही !
सुहृद् बांधवांच्या मनोमंदीरात
विराजे तुझे कार्यही, नांवही.

स्वातंत्र्य प्राप्ती प्रिय भारताला
असे जाहली भाग्य हे केवढे !

तुवा पाहिलें, वाटले धन्य तूंते,
मनीं इच्छिले, लाभले तें पुढें.

दीर्घायुरारोग्य-बुद्धी-स्मृति, ईश
देवो तुला, ही करूं प्रार्थना,

जुन्या राष्ट्रभक्ता, पिढी आजची ही
असे सिद्ध द्याया तुला वंदना ॥

अलिबाग, २८-१-५५

---

## १५ ऑगस्ट

सत्य, अहिंसा बंधु-भावना,
समता, शुचिता याच गुणांनीं

भारत ठरला जगीं श्रेष्ठ हा,
परसत्तेला दिलें झुगारुनि ॥

स्वतंत्र झाला, इतरां दावी
शांतिसुखाचे मार्ग नव नवे,

साम्राज्यमदें मत्त जाहल्या,
परराष्ट्रांचें हृदय धडधडे ! ॥

शस्त्र-बलाहुनि थोर आत्मबल,
जयें पटविलें आपुल्या कृतीनें,

स्वतंत्र भारत, प्रियतम भारत,
त्यास अर्पु या सुगंध-सुमने ॥

अलिबाग, १५ ऑगस्ट १९५६

---

# कै. दे. भ. रामभाऊ मंडलीक

## आदर्श झुंझार पत्रकार

रामचंद्र नारायण मंडलीक। नामाभिधाने ओळखिती लोक,
देशसेवेचा जयांचा लौकीक। महाराष्ट्रीं ज्ञात असे ॥१॥

कुलाब्याचे थोर देशभक्त। राजकारणीं टिळकभक्त,
तयांलागी आदरयुक्त। स्मृति श्रद्धांजली वाहू या ॥२॥

राष्ट्र–समाज–सेवा व्रत। कार्य तयांचे सुपरिचित,
अन्याय, दंभाशी झगडण्यांत। व्यतीत जीवन जाहले ॥३॥

आदर्श झुंझार पत्रकार। दलितांचा पाठीराखा तत्पर,
निर्भिड, निर्भय बाणा थोर। वृत्ति, कृतीही त्यागमय ॥४॥

'विहारी' वितरले राष्ट्रीय विचार। हादरले इंग्रज सरकार!
पारितोषिक लाभे कारागार!। कष्ट तेही साहिले ॥५॥

पित्याचे पत्र 'सुधाकर'। त्यांतूनही प्रगटला प्रचार,
लेखन जणु दिनकरकर। जनमानसा जाणवले ॥६॥

सावरकरांचे शिष्यत्व। क्रांतिकारक व्यक्तीमत्व,
त्यांतूनही उफाळले स्वत्व। जपान–यात्रा साधली ॥७॥

'लोकमान्य' दैनिकांतून। लोकमान्यांचे राजकारण,
प्रसारिले, केले आचरण। महात्माजींच्याही यथाकाल ॥८॥

'कुलाबा समाचार' जिल्हापत्र। देश–जन–सेवा गाजली सर्वत्र,
अन्याय निवारण तंत्र–मंत्र। 'समाचार' नाव सार्थ करी ॥९॥

जिल्ह्यांतील वृत्त–समाचार। अडचणी मांडिल्या नित्य सविस्तर,
विरोधकांचाही 'समाचार'। घेण्यांत माघार न घेतली! ॥१०॥

ऐसा हा पत्रकार प्रथितयश । भाग्ये पुढारी लाभला जिल्ह्यास,
मराठी बाणा दावुनी शत्रु-मित्रांस । प्रयाण केले परलोकी ।।११।।

या देशभक्त पत्रकाराची स्मृती । सुमार्ग दावील नव्या पिढीप्रती,
नांव गाजेल स्वतंत्र भारती । महाराष्ट्राचे निश्चित ।।१२।।

---

## सौख्य-चंद्र उगवू दे

(दुसऱ्या महायुद्ध समाप्तीनंतरच्या एका समारंभानिमित्त लिहिलेले प्रार्थना गीत.)

सौख्यचंद्र उगवु दे जगावर वितरो अमृतकरा,
पुन्हा न्हाऊ दे शांतिरसाने. युद्धतप्त ही धरा ।। धृ०।।

आशा उपजे विजयतरणी जयीं तळपे क्षितिजावरी,
गतवैभव मिळवु दे गांजली राष्ट्रे अवनीवरी.

स्वातंत्र्यास्तव लढति रणांगणी, देहकष्ट भोगिती,
तमा जिवाची नसे तयांना, अन्या परि रक्षिती !

त्यां सौख्य सदा लाभो । नाशुनी दुःख-तिमिरा
जे युद्धबंदी बनले । करूनिया तुमुल समरा,
त्या मनोधैर्य येवो । होऊ दे मुक्त सत्वरा,

राष्ट्रासाठी, जगतांसाठी, कार्य कराया तयां
मिळो आयुरारोग्य संपदा, प्रणती करू आज या ।।१।।

---

[ चाल :- उघडी नयन रम्य उषा... ... ... ]

करित वंद्य कवि रवींद्र धन्य भारताला,
हिंद-भूमि-कीर्ति-काव्य अर्पुनी जगाला ॥ धृ०॥

गीतांजली गाऊनिया, शांतिकिरण फेकुनिया,
मायभूमी-विभव उजळी, काव्य-रवि निमाला ! ॥१॥

गूढ-गुंजतें नितांत, रम्य, सकल विश्व रमत,
ज्ञान भारतीय सतत दिपवी पंडितांला ॥२॥

चित्र-काव्य-गानकला, अपूर्व संगम झाला,
पौर्वात्यीं राजकवी, मिळवी मान्यतेला ॥३॥

देशभक्ती हृदयामधीं, शांतीचा अथांग जलधि,
वाङमय-कर-संभारे, विश्वविजयी झाला ॥४॥

जगत्-धर्म-संमेलन, शांतिनिकेतन भूषण,
देशकार्यी वाङमय, धन, देह अर्पियेला ॥५॥

" विश्वभारतीं " उजळी, संस्कृतीची दीपकळी,
नेत गुरुदेव दूरी, स्वर्गमंदिराला ॥६॥

# तिलक-स्मृति

अर्पुनि अंजली शब्द-सुमांची पवित्र चरणांवरी ।
करू या तिलक-स्मृति साजरी ।।

विस्मृति घडली जनां कधीं नच, हृदयीं नित राहिला ।
उन्नत कर्मयोग शिकविला ।।

जगती येउनी राष्ट्रकार्य बहु केलें, चिर जाहलें ।
वाङ्मय-तप उज्ज्वल सेविलें ।।

'स्वराज्य आपुला जन्मसिद्ध हा हक्क' मंत्र बोधिला, ।
जनांला दिव्य मार्ग दाविला ।।

पाठीस लागती अनेकविध आपदा ।
देशास लागला शाप सुटेना कदा ।
ही दुही करितसे घात सदा सर्वदा ।
जाणीव कुणा मग कर्तव्याची वदा ?

कृपा दृष्टींतें वितरा नरवर 'लोकमान्य' सत्वरीं ।।
व्याकुला भारतभूमीवरी ।।

अलिबाग, टिळक पुण्यतिथी, १९४६

# महाराष्ट्र भूषा बनो भारता

संयुक्त महाराष्ट्र निर्मिती दिनाच्या निमित्ताने—

**वृत्त :- मंदारमाला**

महाराष्ट्र झाला महा-राष्ट्र झाला, मनिषा हृदींची पुरी जाहली.
साकार झाली मराठी मनांची सुस्वप्ने तये वांछिली, पाहिली.
इतिहास ग्रंथी महाभारताच्या, महाराष्ट्र गाजे, तया वंदना
करू या, स्मृती देतसे जागृतीला, असे व्यापिले आमुच्या जीवना !
स्वातंत्र्य निर्माणया दाविला मार्ग अन् आचरिला, जयांची प्रथा,
असे जन्मले, गाजले देशभक्त, इतिहास सांगे तयांच्या कथा.
त्या कर्मवीरांस, त्या धर्मवीरांस, तैसे रणीं झुंजले वीर ते,
स्मरू आज त्यांना, नमू नम्रभावे, महाराष्ट्र-भू ज्यांमुळे गाजते.
संसार, परमार्थ साधा, करा देशसेवा, दिला मंत्र संतीं जना,
साहित्य, संगीत, विद्या, कलांना कलावंत देतात उत्तेजना.
सह्याद्रिच्या साहचर्यामुळे ये मराठी मनालाहि उत्तुंगता,
गांभिर्य वृत्तींत ये सागराचे, विचार-प्रणालीमध्ये भव्यता.

मराठी जनां सौख्य-समृद्धि लाभो, बाणा मराठी असो जागता,
महाराष्ट्र नांदो, महाराष्ट्र गाजो, महाराष्ट्र भूषा बनो भारता.

———

## महात्माजींस शतशः प्रणाम

महात्मा आला, महात्मा आला,
जग वर्णी ज्याची महात्मता,
युगपुरुष म्हणती त्याला,
शतशः प्रणाम, शतशः प्रणाम,
मुक्त भारताचा राष्ट्रपिता,
सर्वोदय-तत्त्वाचा प्रणेता,
चरखा-सुदर्शन धरिले करीं,
परवशता-कालिया-मर्दन करी.
तो मोहन जगाला मोहवी,
भारत बसावा वैभवीं
यास्तव धडपडला रात्रंदिन,
जनसेवेचें मनीं चिंतन.
कृतीनें भारिलीं जनमनें,
सत्यसृष्टींत आणिलीं स्वप्नें,
भारताच्या स्वातंत्र्याचीं,
भारताच्या उन्नतीचीं.
मनीं ध्यास समाज--सुधारणा,
राष्ट्र--सेवेस्तव अर्पिले प्राणा,
मुखें उच्चारिले शब्द ‘ हे राम ’
परलोकी घ्यावया चिर आराम.
महात्मा गेला, महात्मा गेला !
कीर्तीरूपानें अमर झाला.
वंदनीय, पूज्य बापूजींना
शतशः प्रणाम, शतशः प्रणाम ॥

# कुलाबा किल्ल्यास

[सुनित]

दर्यादौलत दुर्ग तू, तुजमुळे स्वातंत्र्य-संरक्षण
झालें, हें इतिहास-सत्य सुखवी, नेत्रांस कांहीं क्षण !

दर्या दैवत मानिती, घडतसें त्याचें मुदें पूजन,
तुझें कार्य स्मृतींत मात्र उरलें ! पाणावती लोचन !

गर्वानें नित गर्जतो, परि हटें त्या भार्गवाच्या भयें,
चंद्राला बघुनी भुलें, भरतसे, जाणीव कां ही न ये ?

स्वातंत्र्यांत न रंगला कधि, परी पाशीं परांच्या पडे !
इंद्राला करभार देत गमतो सामुद्रिकां सांकडे !

त्यातें अर्पिति नारिकेल फल वा मंत्रस्वरें प्रार्थिती,
केलें कार्य स्वराज्य रक्षणि तुवां, त्याचो पडे विस्मृती !

आवृत्तो इतिहास दाखवि जगा, झाली पुराणें जुनीं,
सूज्ञांना पटतें, परंतु न पटे साध्यासुध्यांच्या मनीं !

आंग्रे आज न, भव्य स्मारक उभें त्यांचें समुद्रीं खुलें,
स्फूर्तीस्थान तुला सदा समजु दे, ही कोंकणाचीं मुलें !

---

## चिरनेर मिनार

[ सुनीत : ग. वि. ]

मार्गा आक्रमितां मिनार दिसला पांथास मार्गांत या,
पाही, काय उभे समोर दिसते ? चित्तोर्मि हेलावल्या !

आहे बांधियला कुणी दुखविण्या धर्मीय[1] सद्भावना ?
प्रेमाची[2] प्रचिती प्रिया प्रगटवी, मोही नृपाच्या मना ?

झाला दिग्विजयी महानृपमणी बांधावया[3] सज्जला ?
धर्माचा ध्वज[4] वा इथें निकटच्या देशांतुनी पातला ?

घालाया गगनास कां गवसणी[5] निर्मियली बांधणी ?
जोडाया[6] झटती कि स्वर्ग अवनी, विज्ञानवेत्ते कुणी ?

ऐसे ना घडलें, तरी चिर हृदीं होवोनिया राहिला,
मूल्यें फार नसे, अमूल्यच महाराष्ट्रा परी जाहला !

दावी मानवधर्म आणि शिकवी जिंकू अहिंसा बले,
राष्ट्रप्रेमच एक श्रेष्ठ जगतीं दीप्तीं तयाची खुले !

झाली भूमिच स्वर्ग ! भेद नुरला शांती जगा तारक,
सांगें हें चिरनेरचे नित जनां साधेसुधे स्मारक !

---

१) कुतुबमिनार २) ताजमहाल ३) अशोकाचा स्तंभ
४) संजाण येथील पारशी लोकांचा स्तंभ ५) बेबल बुरुज
६) एफेल टॉवर.

# सेनानी तात्या टोपे

स्वातंत्र्य-संगरीं लढला, सेनानी तात्या टोपे,
शस्त्रसिद्ध आंग्लचमूला, बलशाली हा नाटोपे,
गाजविला गनिमी कावा, जिंकणें जयास न सोपें,
वाखाणिति वैरी ज्याला,
वीराग्रणी या पदवीला,
सार्थ करी, स्मरुं या त्याला,
मिळवून अमरपद बसला, सेनानी तात्या टोपे ॥१॥

देशनिष्ठ, स्वामीनिष्ठ, आपुल्या गुणांनीं ठरला,
दाविलें युद्ध-कौशल्य, कांपविलें ज्यानें रिपुला,
पाहुनी बुद्धिचापल्य, इंग्रजही गुंग जहाला,
घोड्यावर होउनि स्वार,
हातांत नग्न समशेर,
विखुरले सैन्य चौफेर,
रणकंदनिं यम अवतरला, सेनानी तात्या टोपे ॥२॥

फिरविला रणीं माघारा, टोपेनें टोपीवाला,
होवो जय अथवा येवो अपयशही, ना डगमगला,
चमकला रणीं रणशूर, कर्तव्यीं रत राहियला,
आकाशी बिजली चमके,
मेघमंडळा दे धडके,
रणरंगणीं शत्रू थबके,
खेळला युद्ध मर्दानी, सेनानी तात्या टोपे ॥३॥

स्वातंत्र्य-सिद्धि लाभाया, रणचंडी मख चेतविला !
रक्तार्घ्यदान अर्पियलें, तुष्टविण्या रणदेवीला,
स्थंडिलीं असंख्य शरीरें. तो यज्ञ पूर्ण व्हायाला,
उडविली अरींची त्रेधा,
रणकुंडीं जीवन समिधा
वाहियली, दिपवि अविधा,
अजरामर कृतिनें ठरला, सेनानी तात्या टोपे ॥४॥

काल्पीवर केला हल्ला, कानपूर रण रंगविले.
मायभूस मुक्त कराया, संसारबंध तोडियले,
स्वातंत्र्य--समर--यज्ञांत, बलिदान स्वतःचे केलें,
रिपुमर्दन करुनी लढला,
ये दुर्दैवाचा घाला,
फितुरीचा शापच नडला !
वीर हा हुतात्मा झाला, सेनानी तात्या टोपे ॥५॥

जाहली सांगता आतां, यज्ञाची शुभ सुयशांत,
स्वातंत्र्य लाभलें देशा, राहिला न परदास्यात,
साजरि हो समरशताब्दी, या मुक्त भरतखंडात,
प्रक्षोभा दिधली साद,
तो वीरात्मा स्वर्गात,
पावेल मानसी मोद,
कीर्तिचा मानकरी झाला, सेनानी तात्या टोपे ॥६॥

# सयुक्त राष्ट्र संघ

युद्ध तमी जग दडले, मुक्त कराया
तनमनधन अर्पू, चला मार्ग क्रमाया ||धृ०||

संघटना तंत्र जगीं श्रेष्ठ जाहले,
दुर्बलही सबल होती, जगती गाजले,
तत्व नित्य हृदयीं धरू, सिद्ध होऊं या......तनमन......||

ध्येयाने कार्य करू, वीर बनू या,
सर्व राष्ट्र एक होऊ जुट करूं या,
राष्ट्रसंघ नांव सार्थ, प्रथित करू याँ......तनमन......||

थोर दिव्य येई भव्य काळ पुढें हा,
आशेचा घेऊनिया, आसरा महा,
जाऊ पुढे पंथ दिसे ध्येय गांठू या .....तनमन......||

'यूनो ध्वज' देत असे संदेश सदा,
त्याग करा यश मिळवा, जयनाद वदा,
मार्ग दावि जगता त्या वंदन करूं या......तनमन......||

ऑक्टोबर, १९५५

# क्रमू सहकार पथाला

(चाल-मन शुद्ध तुझं......)

जनता जीवन आपत्तींत आजला,
दैन्य हराया क्रमू सहकार-पथाला ॥ धृ०॥

सहकारी-संघटना मंत्र हा भला,
दुर्बल बलवान् बनविण्यास लाभला.
सहकार-तंत्र थोर नेईल प्रगतिला ॥१॥

भारतात राज्य आज लोकशाहीचे,
जगताला देत धडे सत्य-शांतिचे,
सहकारी लोकशाही देइ यशाला ॥२॥

ध्येयाने कार्य करू, एक होऊ या,
सहकार स्वीकारू दुर्दिन जाया,
आत्मोन्नति, राष्ट्रोन्नति साधु या चला ॥३॥

सहकारध्वज देई संदेश पहा
"ऐक्य करा, यश मिळवा" मंत्र हा महा,
सुख-साधन सहकारच होइ जगाला ॥४॥

अलिबाग, १९५७

## सृष्टि रम्य शोभते

डुलविते, रमविते, हृदयें, ईश्वरी लीलेचे दृश्य ते ॥ धृ० ॥

गगनीं घन नाचतात, जल भूवर सिंचतात,
ये निसर्ग बहराला, सृष्टि रम्य शोभते ॥ १ ॥

पुष्प-कुंज डोलतात, दंग भृंग गुंजतात,
वर्षर्तुवातलहरी तनुमनास सुखविते ॥ २ ॥

उत्सव सण साजरे, करित भक्त गुंगले,
दुःख दूर जाऊनी, सौख्य, मोद येत इथे ॥ ३ ॥

---

## पूर्णिमा

चंद्रम विराजला, वर्षित सुधाजला, गगनांत राही,
खुलवी मही, सागर आनंदला ॥ धृ० ॥

अभिनव साज, लेवूनी आज, रमवित जगता
तारा नभांत, सुयामिनी सुखधाम ॥ १ ॥

सरात कुमुदिनी फुले, हाले, रातराणी वायुसंगें नाचे डोले,
सुगंध चहुंकडे दरवळला ॥ २ ॥

कौमुदि मोहवी मना किती ! मतलय सुखवी तनुप्रती,
आली धवलता वसुधेवरी, विश्वांतरी ॥ ३ ॥

---

# सुमन

गेलो एक दिनी प्रसन्न हृदयी मार्गांतुनी हिंडत,
होता खेळत वात मंद मधुनी पर्जन्यही वर्षत.

मार्गी एक असे सु–पुष्प कसले ? ते मोगरीचे दिसे
कोणी टाकियले ? कसे पहुडले ? शंका मनीं येतसे !

देवाचे शिर भूषवून बसणे वृत्ती जयाची सदा,
गुंफावें गृहदेविनी निजशिरीं त्या काय्र ही आपदा !

येती पायदळीं कितीक सुमनें ऐशी, पथीं चालता,
आहे काय जगात रीत असली चोहीकडे पाहता ?

भोळी स्त्रीहृदयें समाज तुडवी तैसे कुणाचे गुण,
संपत्ती मिळवीत मान सगळा कोणी कलावान न !

ऐसे येति बहू विचार करिती चित्तास उद्विग्नता,
पुष्पाचा मधु—गंध येत उपजे मन्मानसीं शांतता.

झालो सिद्ध क्षणीं सुमा उचलण्या आनंदल्या मानसे
चित्तोर्मी उठली, वदे " सुमन हे माझ्या प्रियेचे नसे !"

## वासंतिक उषा

उदित उषा हांसरी, खुलत सृष्टि-सुंदरी,
सूर्यागम सुचवित ये शुक्र उदयगिरिवरी ॥ धृ० ॥
द्युति वसुधा द्योतवीत, प्राची आनंद लुटित,
येत कुसुममय वसंत, हरित्वर्ण भूमि धरी ॥ १ ॥
शेवं ी – पुष्प फुलत, सूर्यकमल हास्य करित,
पवन सुगंधा वितरित, फिरत मेदिनीवरी ॥ २ ॥
ऋतुराज उदार बहुत, भक्तिभाव हृदीं उपजत,
चित्तवृत्ति करि प्रमुदित, प्रेमभावना प्रसरी ॥ ३ ॥
वनीं लता पुष्पवती, पल्लवयुत वृक्ष दिसती,
आम्रासव पिउनि गाति, कोकिळा सुरम्य स्वरीं ॥ ४ ॥
वासंतिक सुखद सुदिन, स्वागत घे ऋतुराजन्,
इच्छित तुजसि चिरंतन, शांत अवनि नित करी ॥ ५ ॥

( मिल्टनच्या song on may morning वरून )

---

## कोकिलेस

गान तुझे गा पिका । सुरम्य गान गायका,
जनमनास मोहिलें, तुवा मधुर गायने ॥ १ ॥
मंद वात सूटला । मधु सुवास दाटला,
प्रमुदित मन जाहले, तुझ्या मधुर गायने ॥ २ ॥
लता फुलुनी डोलती । मधुप मधु सेविती,
मनिं विचार दाटलें । तुझ्या मधुर गायने ॥ ३ ॥

नितांत शांतता गमे । विराजली जणु सुमें,
प्रेम हृदयिं रंगलें, तुझ्या मधुर गायने ॥ ४ ॥
ईश्वरे दिली कला । पिका कृतज्ञता तुला,
प्रभुपदांस प्रार्थिले, तुवां सुरम्य गायनें ॥ ५ ॥
भास कोकिले मला । तव कूजनी जाहला,
स्वर्ग-गीत ऐकलें, तुझ्या मधुर गायने ॥ ६ ॥
रमविसी जनाप्रती । गाउनि, तुझी कृती,
बघुन चित्त तोषलें, तुझ्या मधुर गायने ॥ ७ ॥
नमुनि प्रभूपदाला । स्तवित कवि तया भला,
साथ देई कोकिले, तुझ्या मधुर गायने ॥ ८ ॥

---

## शांतता

[तुफान दर्यावरील नौकेत शांत मुद्रेनें खेळणाऱ्या बालेस पाहून- ]

अथांग जलधीवरी
नौका नर्तन करी
मुखकमलावर तुझ्या खेळतो मधुर हास्यलहरी.
सागर संतप्तला,
हृदयिं धाक पडला !
नौका डोले, चित्त बावरे, कांहि सुचेना परी,
तुजसि काय त्याचे
भान नसे साचे,
प्रार्थिन प्रभुला, देवो मजला बालवृत्ती हंसरी.
हांस हांस छकुले,
मन्मन सुम सुकलें,
बावरलेल्या हृदया माझ्या आनंदवि झडकरी.
गोड मंजु बाला
सुचवी हेंच मला,
बाल मनाला असे शांतता संकट येई जरी. ॥

---

# कुमुदिनी

( पौर्णिमेच्या ज्योत्स्नेत प्रफुल्ल कुमुदिनी एकाद्या सरोवरात दृष्टीस पडावी, तिला पाहून हातांत घ्यावयास आनंदानें जवळ जावे, इतक्यात सुसाट वाऱ्याने ती पाण्यात बुडावी........ ! )

अहा ! सुखद पूर्णिमा, शशिप्रभा अता फांकली,
तडाग–जलही प्रशांत कमलें किती शोभलीं.
सुरम्य प्रतिबिंब तैं विलसलें नभाचें जलीं,
दिसे ' कुमुदिनी ' तदा उमलली सरी रंगली.

नभीं उगवले कितीक ग्रह, चंद्र नी चंद्रिका,
जणूं गमत माणकें लटकतीं तशा तारका,
छतास नभिच्या कसा जडविला हिरा शुक्र हा,
तसेच ग्रह हे कसे चमकतात रत्नें पहा !

नभांत दिसल्या कितीक जरि तारका दृष्टिला,
मदीय मन गुंगलें ' कुमुदिनी ' वरी प्रेमला,
सुगंध वितरें जगीं " निजगुणें जनां तोष द्या "
असेच सुचवीत ती ' कुमुदिनी ' तुम्ही बोध घ्या.

हृदीं भरत प्रेमभाव मग भेटण्याला तिला
सरा–निकटि जात मी अह्‌ह्‌ ! वायु हरतो तिला !

---

## अरुण–प्रभा

मिहिरमणी। उदयाचलिं येईल क्षणीं।।
सुंदरशा। रंगें खुलली पूर्व दिशा।
शौर्यबलें। अंधकाररिपु हटविलें।
शुक्र--हिरा। चोपदार ये सामोरा।
        सांगाया। रवीराज हा ये उदया।
        तम लपले। सूर्य--किरण भूवर आले।
        दुष्टमती। व्याघ्र--सिंह भिउनी दडती।
        अरुण–प्रभा। पूर्वदिशेला दे शोभा।
मंजुरवें। द्विज गाणीं गाती भावें।
वनदेवी। गानें स्तविती उदयरवी।
कमलफुले। फुललीं, मधुप मुदे सुटले।
नवलाचे। दंवबिंदु अमृत साचे।
        शिंपियले। लतावृक्ष हे टवटवले।
        पुष्पांचा। पाडित ते पाउस साचा।
        किरणांचा। दीप गमे जणु तेजाचा।
        लावियला। मार्ग दाविण्या जगताला।
सुचवितसे। ‘ उठुनी लागा कार्यी कसे ’।
मोदभरें। स्तवन करित कवि प्रेमभरें।
गाऊं या। प्रभूराज–पद वंदूं या।
‘ सुख होवो। दिन आनंदानें जावो ’॥

# अरुण--गान

रजत–रंग--किरणांनीं भूषित भू झाली ! ॥ धृ० ॥
उषा उदित मुदित मनीं
सुम--कलिका फुल्ल वनीं,
जागृति ये त्वरित जनीं, सुषुप्ती पळाली,
द्विज गाती अरुण--गान, प्राची प्रबोधली !
सु—प्रभात— वात सुटत
मोहक मधु--गंध भरित,
देव--अमृत कुणि सिंचित, तरु--लता बहरली,
द्विज गाती अरुण–गान, प्राची प्रबोधली !
निज तेजा त्यजि शशि हा,
ग्रह तारे लुप्त पहा,
चित्ता दे सौख्य अहा ! कौमुदी लोपली,
द्विज गाती अरुण–गान, प्राची प्रबोधली !
दूर होय तिमिर-विघ्न,
विश्व सकल मोद–मग्न,
कवि मन परि आस–भग्न याहि रम्य कालीं,
द्विज गाती अरुण-गान प्राची प्रबोधली ! ॥

---

# प्रभात--वर्णन

गात द्विजगण पहा, यामिनी संपली
कानर्नी सुमकली सर्व फुलली;

उदित गगनीं रवी, रक्तवर्णी दिसे,
मोद देई मना शांति विलसे;

प्रातवायू सुटे विखरी मधू गंध हा,
मधुमालती कुंज फुलला अहा !

एकसरी सेवण्या सिद्ध मधु धांवले,
परिमलें गुंगले भ्रमर सगळे.

होय दूरी आतां, तम निशींचा शिशिर !
मरुत हा शीत सुखवी शरीर !

बालगण द्रुतगति, चालती पाहि हे,
अध्यापकहि येत शालागृहे.

ऊठ, मुखमार्जन, स्नान, शिशु आवरी,
वेश कर, जाई, रम पाठांतरी ॥

( एका बंगाली गीतावरून )

## उल्का

(गज्जल)

निराशा त्रासवी जीवा । मिळे ना सौख्य चित्ताला,
भागलो, गांजलो चित्तीं । येइ ना कींव कोणाला !

भंगल्या त्रस्त हृदयाला । देतसे प्रेम आधार,
जाहला भंग प्रेमाचा । होतसे दुःख अनिवार !

शोधण्या प्रेम--सुमनाला । होउनी अंतरीं कष्टी,
बैसलो जाउनी रानीं । नभपटीं लागली दृष्टी !

बहरली विविधशीं पुष्पे । नभाच्या बागशाहींत,
तारका एक हसणारी । विहरते स्वैर कुंजात.

द्यावया प्रेम मम हृदया । येइ का तारका बाला ?
उपजली गोडशी आशा । मुखावर हास्य भर आला.

निखळली दिव्य--प्रभ तारा । यावया भूतलावरती,
मीटले नेत्र मज वाटे । भेटण्या येत मजसी ती !

विराली वायुआवरणी । तारका, हाय ! आशेची,
निराशा तीव्र मम झाली । भंगल्या प्रेमहृदयाची !

## सौदामिनी

नाचत खेळत वारिराशि वाहनावरी बैसुनी
निघे दिग्विजया सौदामिनी.

जिंकुनियां दशदिशा जाहली विजयी विद्युल्लता,
विहरे विशाल वियतीं अता.

विजयोन्मादे हर्षित होउनि हेषारव हय करी,
- तोच मेघनाद गगनोदरीं ! —

युद्धांत बहुत हो वीज क्लांत, श्रांतली,
बहु प्रबल श्वास उच्छ्वास टाकू लागली,
झुंकारित झंझावातच ये भूतलीं !

घर्मजलानें स्नात बलाहक-अश्व होय अंबरी,
पडती ह्या पर्जन्याच्या सरी !

---

## इंद्रधनू

सुहृदसंगें सहल करण्या चालता गेलो वना,
इंद्र-धनुची दिव्य शोभा तोष देई मन्मना.

जेथ दिसतीं हरित क्षेत्रे आणि वृक्षहि दाटले,
निर्झरिणिच्या त्या तटाकीं बैसण्या मन मोहिले.

झीमझिम् पर्जन्य पडतो शांतवी हे भूतल,
मंद वायु गीत गाई, स्पर्श तनुला शीतल.

सप्तरंगांची शलाका भूषवितसे अंबर,
-- चित्रकाराची कृती जणु रंगली पड्यावर ! -

रंगभूमी – नील नभ ते – वाटते जणु चित्रिली,
गर्जना जलदावलींची – नाटयगीतें गाईलीं –

मित्र वदला, जाऊ बघण्या खेळ व्योमीं चालला,
शोधण्याला सिद्ध झालों, मार्ग जाया कोठला ?

गडगडाटे रंग विरले, कृष्ण मेघीं दाटलें,
नीलनभ ते, वीज चमके, हृदय मग थरकापले !

---

## गगनात

वर्षीत सुधा शशी, कौमुदी नटली ।
शांतरसें वसुधा भरली ॥
ती मुदित करी चांदरात चित्ताला ।
खुलवितात ग्रह गगनाला ॥
बहु नटलेल्या तारा हंसती, डुलती ।
प्रसुनांची पखरण जणु ती ॥
त्या वियति पहा रक्तवर्ण ग्रह चमके ।
नभ–छतास माणिक झळके ॥
मेघ येती कुठुनी काळे,
नभ सगळे झाकुन गेले,
ग्रह तारे लुप्त जहाले,

* * * *

ढग मावळले, विलसे शशि गगनांत, परि निराशाच हृदयात ! ॥

---

२२८० काव्य
२९११०

## रायगडास

ते कोंकणी मराठे, ते मावळी मराठे
लढले तुझ्याचसाठीं, तुज वंदी रायगड मी ॥ धृ० ॥
तो धन्य श्री शिवाजी, आजन्म कष्ट केले,
रणशूर वीर गाजी, स्वातंत्र्य मेळविलें,
मुस्लीम बादशाहा, पायीं विनम्र झाले,
अष्ट प्रधान त्यांनीं, स्थापोनी राज्य केलें,
गड राजधानी केली, तो वंदी रायगड मी ॥ १ ॥
शिवराय शिष्य ज्यांचा, गुरु रामदास झाले,
झिजवून देह राष्ट्रा, जगतात धन्य केले,
तानाजी, शूर बाजी, स्वर्गीं लढोनी गेले,
स्वप्राण अर्पुनीयां, निज-राष्ट्र भूषवीले,
लढले तुझ्याचसाठीं, तुज वंदी रायगड मी ॥ २ ॥
गडराय कीर्ती ऐशी, तुजलागी रे मिळाली,
झाली मराठशाही, जगीं धन्य धन्य झाली,
परी दैव राष्ट्रभूचे, परतंत्रता मिळाली !
द्यावा कुणास बोल ? कुदशा आम्हांस आली,
ऐक्यास दूर केले, झालों आम्हीं निकामीं ! ॥ ३ ॥
ते कष्ट पूर्वजांचे, स्मरणांत आज आले,
ती चैन-बाजी आमुची, नेत्रांत अश्रु आले,
गप्पांत दंग झालों, हाती न कांहीं केले,
शिवराय धाव घेई, हे दुःख फार झाले,
अवतार घेई आता, तुजलागीं प्रार्थितो मी ॥४॥
प्रभुराय मार्ग दावी, करि प्रार्थना तुला मी,
आम्हांस स्फूर्ती देवो, तो वंदी रायगड मी ॥ ५ ॥

(स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची कविता)

( चाल :- प्रणय तरंगासवे )

अनुरागें रंगली, पश्चिमा सुशोभली,
दिनकरा, प्रियकरा पाहुनिया लाजली ॥धृ०॥

आक्रमुनी तें विहाय, दिनराज क्लांत होय,
लाली ही चढत काय तद्वदनीं भासली ॥

मेघखंड पसरलें, स्वागतार्थ ते जमले,
हास्यें रविराज खुले, गोड-प्रभा फांकली ॥

सागर संगीत गात, आनंदे स्तव करीत,
जलदेवी मधुर हंसत, प्रेमभरे जणु खुलली ॥

अस्तगिरी शिरावरी, पश्चिमदिक्-मंदिरी,
प्रविशत हा ध्वांतअरी, गान गाउ लागलो ॥

विश्रांती घ्यावयास मिहिरमणी जात त्यास,
प्रेमभरे रिझविण्यास 'संध्या' ही सज्जली ॥

विश्व गाइ आनदे, प्रेम-गीत स्वच्छंदे,
'कृष्णकमल' गात मुदे 'संध्या' सूक्तावली ॥

# तारकेप्रत

ये दे भेट मला अता उतर तू आकाशगेहांतुनी,
केव्हां येशिल वाट मी बघत गे प्रेमाश्रुतें ढाळुनी;

हास्याची कलिका त्वरें उमलु दे सद्‌गंध चोहींकडे,
प्रेमाची सरिता तुडुंब भरुं दे पाणीच पाणी गडे !

आनंदें खुलली नभोंगणि पहा चंद्रासवे रोहिणी,
सौख्याचा फुलबाग तो बहरला तेजस्वि तारांगणीं;

सारे भूतल सौख्यपूर्ण भरलें वाटे मृगांकाकरें,
वेली आणिक वृक्षही डवरले वायू सुगंधें भरें;

प्रेमानंद भरे हृदीं, मग तुला प्रेमेच बोलावलें,
वेगें येऊनि शांतवी मज अतां गे तारके शीतले,

काव्यानें भरल्या पहा दशदिशा, हृत्ताप दूरावला,
गीतांची रचितो तुला बघ अता ही माळ घाली गळा.

– गेली रात्र सरून जाय स्वगृहा ती प्रेमला तारका,
वाट ठेऊनी चालली मजप्रती सौख्य–स्मृती मालिका !

---

# विद्यालय--गीत

[ भगिनी कै. श्रीमती गोदावरी राहाळकर यांनी त्यांच्या शाळेसाठी लिहिलेले प्रार्थना पद्य.]

(चाल : रक्ष रक्ष ईश्वरा, भारता ..)

धन्य, जगीं शोभली हिंदभू, प्राचीनापासुनी ।
पुन्हां विलसुं दे स्वातंत्र्याने आस हृदीं निशिदिनीं ॥ धृ० ॥

जागृति आली, स्वराज्य रवि ये राष्ट्रोदगिरिवरी,
गतवैभव मिळवु दे मायभू, पुनरपि जगतांतरी.

विद्या देवी वसे चिरंतन वीणाधारी जिथें,
पवित्रता, मंगलता, सुखकर शांती विहरे तिथें,
हळदवणेकर कन्याशाळा ही असे बहु प्रिय अम्हा,
मातेसम लाविला लळा पाजुनि विद्यामृत महा,

ही ज्ञान-किरण वितरो । नाशुनि अज्ञ-तिमिरा,
ही स्वाभिमान पसरो । देशाभिमान-प्रचुरा,
ही दीप्ति धैर्य देवो । व्यायाम-पुष्ट शरीरा,
ही स्फूर्ति सुचिर देवो । शिकवुनी कला रुचिरा.

देशासाठीं, शाळेसाठीं, कार्य कराया मनीं
उत्साह वसो सदा, प्रभुपदीं प्रणति करूं प्रतिदिनीं ॥ १ ॥

– गोदावरी राहाळकर, शिक्षिका

( शिखरिणी )

जलाच्या वृष्टीला हरुनि, मग सृष्टी खुलविण्या
जगाची भूषा हा ऋतु शरद आला रमविण्या,
वसंताची शोभा अमित म्हणती कोणि, न परी,
अमूपा तुष्टी ती रुचिर शरदाची सहचरी.
तडागीं पूर्णत्वें बहुत खुलल्या त्या कमलिनी,
समीरा संगींचे मधुप, मधु-गंधास भुलुनी
मरंदा सेवोनी, मुदित-मन, गुंजारव पहा,
उठे. भासे गाने, मग अवनि स्वर्लोकच अहा !
निशाकालीं तारें विहरत नभी, तेज विखरे,
विराजे रक्तांग प्रखर, चमकें माणिक खरे.
प्रभा चंद्राची त्या विमल, ग्रहरत्नें पसरली,
भरे मोदें व्योम, प्रसरत पुढें, भू विलसली.

शरद् आला माझ्या फुलवि न सरोजास हृदयीं,
तरी म्यां गावी कां स्तुतिच शरदा याहि समयीं ?

---

## परिशिष्ट : ( प्रासंगिक काव्यरचना )

[ विशिष्ट प्रसंगीं, कारणाकारणांनी, काही काव्यरचना केली गेली ! त्यांतील काही नमुने पुढे दिले आहेत. ]

# मृत्यु

दुःखमय रात । भरला अंधकार ।
नित्य आजवेरी । वाजविले द्वार ।। धृ० ।।

यातना शस्त्र हातीं । दुःख नयनांवर ।
मलीन मुखाचे । भय वाटले फार ।। १ ।।

पटला करू दूर । मम यत्न फलहीन ।
यशापयशीं साच । फसवी संसार ।। २ ।।

शैशवापासूनी । पाठी लागे भूत ।
विकट-हास्य-युक्त । अशक्य प्रतिकार ! ।। ३ ।।

भय चित्रें सरकती । सारखी सभोती ।
काळोख पसरे । दाट सभोवार ।। ४ ।।

रेखी चित्रावली । तमोपटावरी ।
कुशल नीज हस्तीं । मृत्यु कलाकार ! ।। ५ ।।

(रवींद्रनाथांच्या शेवटच्या गीताचा स्वैर अनुवाद)

पनवेल, सप्टेंबर १९४१.

---

# एक स्वागत-गीत

[ धरमतर पुलाच्या उद्‌घाटन प्रसंगी म्हटलेले गीत. ]

नमन प्रभू रामचंद्रांना, उदेला भाग्य दिन अजि हा ॥ धृ० ॥

स्वागतम्, प्रमुख मंत्र्यांना
करितसे प्रमुदिता जनता,
उघडण्या पूल नव भव्य
विनंती करित यशवंता ॥ १ ॥

मराठी मर्द बाण्याचा
पेशवा थोर मुंबईचा,
कुलाबा प्रथित इतिहासीं,
समसमा होत संयोगा ॥ २ ॥

सुवेळीं बांधला सेतू
प्रभू श्रीरामचंद्रांनी,
सुवेळी पूर्ण हो हेतू
धरमतर मार्ग होवोनी ॥ ३ ॥

मार्ग हा विभववृद्धीचा,
मार्ग हा प्रांत उन्नतीचा,
मनीषापूर्ती ही साची
कुलाबावासी जनतेची ॥ ४ ॥

---

# आजची दिवाळी !

" त्रिविध कर्तव्य करावें । स्वर्गमंदीर गांठावे, "
उपदेश संतीं केला । भक्तगणीं मानीयेला.
काळ पालटे पुढती । शब्द अर्थ बदलती !
साधुसंत गेले दूरी । पुढें आले हे पुढारी.
अनुयायांना उपदेश । देती म्हणती आदेश,
" त्रिविध कर्तव्यें करितां । समाधान लाभे चित्ता,
व्यक्तिहित आतां विसरा । समाजाचें हित करा,
समष्टीनें करा यत्न । श्रमविभाग साधन ! "
देहसेवा धनिकांसाठीं । देवसेवा संतांसाठीं,
देशसेवा सामान्यांची । वाटणी ही कर्तव्यांची !
वसत धनिक प्रासादांत । संत जाती देवळांत.
सामान्यांच्या नशिबांत । नीट घरेंही नाहीत !
देश संकटीं पडता । सण उत्सव कां करिता ?
सण साजरे करता । अजीर्णाची वाटे चिंता !
गूळसाखर सांडली । धान्यवस्त्र महागली,
अन्न मोजूनिया खावे । एकभुक्त व्रत घ्यावें !
कार्यकर्त्यांना उचित । उपवास थोर व्रत,
सकला इच्छित लाभेल । राष्ट्र उत्कर्षा पावेल !
देहशुद्धी, चित्तशुद्धी । आधीं, मग शुद्धबुद्धी,
प्राप्त होतां कार्य थोर । होत राही खरोखर !
" आपुलाच आपण वैरी । झाला मानव संसारीं "
संतउक्ति सार्थ झाली । हीच आजची दिवाळी !

( दीपावली, १९५० )

---

## क्रीडा-ध्वज-गीत

( चाल--बहु असोत सुंदर संपन्न की महा )

संयम, निर्धार, शिस्त, गुण प्रतीक हा,
ध्वज फडके उच्च पदी त्यास वंदु या ॥धृ०॥

सह्यगिरी, सागर नित निकट राहती,
रायगडी छत्रपती शिव-प्रभू-स्मृती.
दुर्ग कुलाबा विजयी ज्यास नाव दे,
जिल्ह्याच्या शाळांतील छात्र-गण मुदे
सिद्ध आज क्रीडा-स्पर्धेत रमाया ॥१॥

ऐक्यभाव दावितात तारका सदा,
ज्योति दावि उत्कर्ष सुमार्ग सौख्यदा,
रंग केशरी उपजवी सतत दर्शनी
त्यागवृत्ति, सेवा, सद्भावना मनी,
'बलमुपास्व' हाच श्रेष्ठ मंत्र गाऊ या ॥ २ ॥

या ध्वजास एकनिष्ठ राहु निशिदिनी,
शपथ तया पुढति घेऊ, कृतीत दावुनी,
क्रीडांगणी क्रीडांचे नियम पाळुनी,
खेळाडू वृत्तिहि शालेय जीवनी,
मातृभूमी सेवेस्तव सिद्ध होऊ या ॥ ३ ॥

अलिबाग, १५-१२-५३

परिशिष्ट : २

या संग्रहाचे प्रस्तावना लेखक **प्रा. डॉ. अे. व्ही. कुळकर्णी** यांनी "मित्राक्ष" दिवाळी अंक–१९७४ साठी टिपलेली

## श्री. कृ. के. राहाळकर यांची

# मुलाखत

**राहाळकरांचा** जन्म १९०८ सालचा. म्हणजे ते महाराष्ट्राच्या किंवा भारताच्या महत्त्वाच्या काळाचे साक्षीदार. राजकीय दृष्टचा लो. टिळक ते इंदिरा गांधी हा प्रवास या काळात झालेला. भारताच्या स्वातंत्र्यदिनी तर राहाळकरांना चाळीशीत म्हणजे जाणत्या वयात असण्याचे भाग्य लाभलेले. मराठी साहित्याच्या दृष्टीनेही हा काळ संस्मरणीय असाच. हरिभाऊ, केशवसुतोत्तर कवी, खाडीलकर, गडकरी यांच्यापासून फडके, खांडेकर· माडखोलकर, रविकिरण मंडळ, वरेरकर यांचा मधला काळ; त्याचप्रमाणे अनिल, कुसुमाग्रज, बोरकर, अत्रे आणि मग पुढे पेंडसे, भाऊ पाध्ये, मर्ढेकर ते ढसाळ, रांगणेकर ते खानोलकर असा खूप वेगवेगळी रूपे दाखविणारा विस्तृत काळ. लोकांसाठी लो. टिळक मंडालेच्या कारागृहात गेले त्या १९०८ सालापासून, लोकांसाठीच कोणत्याही कारागृहात जाण्यासाठी सज्ज असलेल्या जयप्रकाशजींच्या आजच्या काळापर्यंत बसलेल्या अनेक धक्क्यांमुळे भारतीय समाजाचे अंतरंग व बहिरंग संपूर्णपण बदलून गेलेले,

या अशा क्रियाप्रतिक्रियांतून संभवणारी सारी स्पंदने राहाळकरांनी डोळसपणे टिपलेली आहेत असे नाही, तशी अपेक्षाही योग्य ठरणार नाही. प्रारंभी ठाणे आणि मग कुलाबा, अशा अडचणीच्या जिल्ह्यांत त्यांचा प्राधान्याने निवास झाला. या भागालाच अनुपलब्ध असलेल्या सोईसवलतीं-पासून तेही दुरावले गेले. लेखन किंवा वाचन याबाबतीत राहून गेलेल्या त्रुटीची जाणीव आजही त्याना सलताना दिसते. पण आपल्या मर्यादित शक्तीनुसार स्वत:भोवती साकळून आलेल्या चाकोरीला छेद देण्याचे प्रयत्न

करीत त्यानी त्यांचे दिवस काढलेले आहेत. त्यांच्या कोष्टकात न बसणाऱ्या मुद्रणकलेचा त्यांनी अभ्यास केला आणि अध्यापनही केले. कैद्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास केला आणि कारागृहात जाऊन कैद्यांचे वर्ग घेतले. ग्रंथालय चळवळीचा, तिची उपयुक्तता पटून अभ्यास केला आणि सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाहपद, कार्याध्यक्षपद सांभाळले, व त्या चळवळीला वाहून घेतले, नियतकालिकांचें संपादन केले, काही किरकोळ, कथा व इतर लेखन केले, संस्थांचे इतिहास लिहिले. कविताही लिहिल्या. त्या जुन्या अलिबाग सारख्या ठिकाणी राहून त्यानी हे जे केले तेही पुष्कळ आहे. त्यांचे शाळेतील एक सहकारी-शिक्षक व ख्यातनाम इतिहास संशोधक कै. शां. वि. आवळस्कर पुढे पुण्याला गोखले इन्स्टिटयूटमध्ये गेले. तिथून त्यांनी राहाळकरांना लिहिले होते, 'तू तिथे उगाच खितपत पडलेला आहेस, तुझी जागा पुण्यासारख्या ठिकाणी आहे.' त्यांच्या या शब्दातील मित्रप्रेम वजा केले तरी राहाळकरांचा वेगळेपणा मान्य करावाच लागतो.

आज राहाळकर स्वतःच्या वास्तूत तसे निवांत आहेत. आयुष्याच्या मध्यकाळी पत्नी सोडून गली. या दुःखावर त्यानी मात केलेली आहे. दमा आहे, पण त्यालाही सध्या रोगापेक्षा सोबत्याचेच स्वरूप प्राप्त झालेले दिसते! चार मुलींपैकी तिघी सुस्थळी नांदत आहेत, चवथी अरुणा पुण्याला कॉमर्सच्या शेवटच्या वर्गांत शिकते आहे. दोन्ही मुलगे कर्ते व मिळवते झालेले आहेत. मुख्य म्हणजे साऱ्यांच्याच ठिकाणी साहित्य वा संगीत अशी कलासक्ती वास करते आहे.

गेली काही वर्षे राहाळकर निवृत्ताचे जीवन जगत आहेत. पण ही फक्त 'सेवा' निवृत्ती आहे, 'जीवन' निवृत्ती नव्हे. जीवनाबद्दलचे त्यांचे अगत्य उदंड आहे. पुढे टिपलेली मुलाखत हा त्याचा एक ठळक पुरावा. —-

प्रश्न १ :- वाचनाची आवड तुमच्या ठिकाणी कशी निर्माण झाली? तिची जोपासना तुम्ही कशी केली? तुमच्या बालपणीच्या कालाच्या पार्श्वभूमीवर मी हा प्रश्न विचारतो आहे.

उत्तर :- आमच्या घरी पुस्तकांचा संग्रह होता. वडील व चुलते यांना वाचनाचा छंद होता. शिवाय इतरांकडील पुस्तकेही येत. त्यामुळे साहजीकच

आपणही वाचावे असे वाटे व त्याप्रमाणे वाचन सुरू झाले. चिपळूणकर मंडळीचे महाभारत, भारत गौरव ग्रंथमाला, सुरस वाङ्मय रत्नमाला, नाथमाधव, यांचे वाचन प्राथमिक शाळेत असतानाच झाले. शिवाय त्या काळी प्रसिद्ध असलेली चित्रमय जगत्, नाडकर्णी मंडळीचे ' नवयुग ' अशी मासिकेही घरी येत. त्याचेही वाचन होई. अरेबियन नाईटस्चे मोठे पुस्तक वीरधवल कादंबरी, यांत मन रमले. इसापनीतीही वाचली. केसरी, कै. शि. म. परांजपे यांचे ' स्वराज्य ', कै. सितारामपंत दामले यांचे ' राजकारण ' अशी साप्ताहिकेही वाचीत असे. तो एक छंदच जडला.

प्रश्न २ : – लेखनाकडे तुम्ही कसे वळलात ? सहजप्रवृत्ती म्हणून की काही कारण घडले ?

उत्तर :– वाचनानंतर आपणही काही लिहावे, असे वाटू लागले. वडील कै. के. वा. राहाळकर यांच्या प्रोत्साहनाने लिहावयास सुरूवात केली. प्राथमिक शाळेत ६।७ वी पर्यंत मला नाटकेही खूप पहावयास मिळाली. आपणही एकादे नाटक लिहावे असे वाटले ! त्या काळात ' व्यसन निषेध ' म्हणून नाटिका लिहिली. अर्थात ती प्रसिद्धीला देऊ शकलो नाही आणि आज ती उपलब्धही नाही ! ' बा सागरा ' याच्या अनुकरणाने ' अरे तिमीरा ' हे लेखन झाले आणि ते अलिबागच्याच ' सुमन ' मासिकात प्रसिद्ध झाले. ' हा हिंद देश माझा ' या गीताचें अनुकरण ' महाराष्ट्र देश माझा ' या गीतांत झाले. इंग्रजी चौथ्या व पाचव्या यत्तेंत हे लिखाण झाले.

प्रश्न ३ :– प्रारंभकालीन लेखनाबाबत विशेष सांगण्यासारख्या काही आठवणी ?

उत्तर :– विशेष अशा आठवणी नाहीत. पण लघुकथा लेखनाला सुरवात झाली ती मात्र विशिष्ट कारणाने. प्रवासात असताना परप्रांतीय, परदेशी वृत्तपत्रे वाचनाचा छंद होता. त्यांतील कांही लघुकथा वाचल्यावर तसे वातावरण, तशा व्यक्ती, आसपास आढळल्या. त्यावर कथा लिहाव्या असे वाटले आणि सुरवात झाली.

प्रश्न ४ :– लेखनाच्या दृष्टीने लेखकाला काही पूर्वतयारी करावी लागते का ? तुमचा अनुभव काय आहे ?

उत्तर :– या बाबतीत म्हणावयाचे तर लेखन विषय हा काही घटनांनी सुचतो. तो मांडावयाचा कसा याबाबत थोडी फार पूर्व तयारी करावी लागते. भाषा विषयानुरूप आणि परिस्थितीनुरूप (वातावरण, व्यक्ती वगैरे) वापरण्याबाबत विचार करणे जरूर आहे असा माझा अनुभव आहे.

प्रश्न ५ :– तुमचा म्हणून जो काळ आहे, त्या काळातील लेखक, **निरनिराळे वाङ्मयीन वाद यांचा तुमच्यावर कोणत्या स्वरूपात परिणाम झाला ? अशा गोष्टी प्रोत्साहन ठरतात की अडथळे ?**

उत्तर :– आमच्या काळांतील लेखकांच्या वाङ्मयाचा आमच्यावर परिणाम झाला हे मान्य करावयासच हवे. वाङ्मयीन वादाचा मात्र विशेष परिणाम झाला नाही. प्रा. फडक्यांपेक्षा मला खांडेकर, य. गो. जोशी यांच्या सारख्या लेखकांचे वाङ्मय विशेष आवडणारे ठरले. कलेकरता कला की जीवनाकरता कला हा वाद आमच्या काळांत होता; जीवनाकरता कला हे मला आधीच पटले होते. साहजिकच त्या दृष्टीने माझे वाचन व लेखन झालें. पाश्चात्य लेखकांपैकी, टॉलस्टॉय, चेकॉव्ह, पिरँडेल्लो, मोपासाँ वगैरे लेखकांचे वाचन आवडीचे ठरले. एकदा लेखन करावयाचे ठरले, मार्ग निश्चित झाला म्हणजे वाङ्मयीन वाद हे अडथळे ठरू शकत नाहीत, शकणार नाहीत. वाचकांवरही त्याचा परिणाम होत नाही. उदा. लघुकथांचे तंत्र ठरले आहे. असे असूनही कै. य. गो. जोशी यांच्या कथा, शेवग्याच्या शेंगा, सुपारी, वहिनीच्या बांगड्या वगैरे लघुकथा तंत्रात बसत नसूनही लोकप्रिय ठरल्या आहेत. टॉलस्टॉयची Two old men, टागोरांची काबुलीवाला, एक होता राजा वगैरे कथा साध्यासुध्या भाषेत असूनही सर्व सामान्य वाचकाला (निदान आमच्या काळांतील तरी) आवडणाऱ्या ठरल्या.

प्रश्न ६ :– प्रकाशक, वाचक, टीकाकार व इतर लेखक किंवा साहित्य परिषदेसारख्या संस्था यांच्याविषयींचा तुमचा अनुभव ?

उत्तर :– प्रकाशकांशी माझा प्रत्यक्ष संबंध आला तो थोडासा. पण त्यांचा, इतर लेखकांचा, टीकाकारांचा अनुभव चांगला मिळाला. सर्वांकडून उत्तेजनच मिळाले. विशेष करून विद्यार्थी वाचकांकडून, साहित्यिक म्हणून ठरलेल्या गुरुजी, मित्र मंडळी यांचेकडून कौतुकच झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अनुभव मात्र वाईट आहे ! माझ्या पुस्तकावर बरा वाईट अभिप्राय देण्याचे सौजन्यही दाखविले गेले नाही ! मी त्या संस्थेचा सभासद होतो. शिवाय त्यांच्या परिक्षांचा परीक्षक म्हणूनही काम केले. तरी अशी वागणूक !

प्रश्न ७ :– साहित्याकडून तुम्ही कशाची अपेक्षा करता ? साहित्याच्या स्वरूपाबद्दलची तुमची कल्पना ?

उत्तर :– साहित्याकडून समाज सुधारण्याची अपेक्षा करणे चुक ठरू नये. साहित्य वास्तववादी असले पाहिजे. समाजातील बऱ्यावाईट घटना, व्यक्ती, यांची वास्तव चित्रणें समाजापुढे साहित्याच्या द्वारे आली पाहिजेत. जग अनेक बऱ्या वाईट प्रवृत्तीनी भरलेले आहे. सर्वांच्या अनुभवाला सर्वच प्रवृत्ती येतात किंवा येतील असे नाही. पण जर समाजाचे यथातथ्य दर्शन साहित्याद्वारे झाले तर सर्व सामान्य माणूस जीवनांत यशस्वी होऊ शकेल. वाईट टाळू शकेल, चांगल्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करील.

प्रश्न ८ :– आजचे साहित्य तुम्ही पाहाता काय ? तुम्हाला ते कसे वाटते ? अध्यापनकालात विद्यार्थ्यांच्या लेखनप्रवृत्तीची जोपासना वगैरे तुम्ही कशी काय केली ?

उत्तर :– आजचे साहित्य वाचतो. मला सर्वच उपयुक्त (माझ्या कल्पनेप्रमाणे) वाटत नाही. बदलत्या काळाप्रमाणे साहित्याचे रूप बदलणे अटळ आहे. पण तसे बदलताना काही वेळा ते वास्तवापासून दूर जात आहे असे मला वाटते. अर्थात् हा मतभेदाचा प्रश्न ठरेल.

अध्यापन कालांत विद्यार्थ्यांच्या लेखनप्रवृत्तीची जोपासना करण्यात मला थोडेफार यश लाभले आहे. या बाबतीत विद्यार्थ्यांवर मी माझी मते कधीच लादली नाहीत. माझ्या शिकवण्याच्या पद्धतीनेच त्यांना मार्गदर्शन मिळत गेले. विद्यार्थ्यांनी लिहिलेले लिखाण, जरूर तर त्यांचेचकडून पुन्हा लिहून घेऊन (आवश्यक त्या सुधारणा सुचवून) प्रसिद्ध करणे, मला, मी शालेय नियतकालिकाचा अकरा वर्षे संपादक असल्याने शक्य झालें. शिकवताना मुले शंका विचारीत. त्या अभ्यासाबाहेरच्या म्हणून डावलून न टाकता त्यांचे माझ्या दृष्टीकोनांतून निरसन करीत असे. शाळेत निबंध लिहावयास देताना, भरपूर मुद्दे देत असे. विषय शिकविताना विशिष्ट पद्धतीच मी वापरत नसे. एक अनुभव, यशवंत कवीची ‘ आई ’ कविता शिकवीत होतो. काही वेळाने वर्गात हुंदके ऐकू आले ! कविता संपवली. त्या काही विद्यार्थ्यांनी यशवत कवींच्या कविता वाचून काढल्या व नंतर लिहीण्याचाही प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी काय वाचावे याबद्दल मार्गदर्शन करीत असे. त्यामुळेही विद्यार्थ्यांतील लेखन प्रवृत्ती वाढीला लागली. अर्थात् ही माझी वृत्ती मराठी शिकवतानाच होती असे नाही, इतिहासासारख्या विषयाबाबतही तसेच घडे. त्यामुळे केवळ ललित वाङमय लेखनाकडेच नव्हे तर इतर विषयांवर लेखन करण्याकडेही विद्यार्थी वळले.

प्रश्न ९ :– साहित्याच्या स्वरूपात घडणाऱ्या स्थित्यंतराबद्दलच्या तुमच्या प्रतिक्रिया काय आहेत ? तुमच्या आजवरच्या जीवनात तुम्ही जी अशी स्थित्यंतरे अनुभविली त्याबद्दल तुम्ही काय सांगू शकता ?

उत्तर :– मी तीन पिढयांतील स्थित्यतरे पाहिली. स्थित्यंतरे आवश्यक आणि अटळ आहेत. पण ती परिस्थितीला धरून झालेली नाहीत (काही अपवाद वगळता) असे मला वाटते. विज्ञानाची प्रगती जोराने होत आहे मानव चंद्रावर जाऊन आला, शुक्रमंगळावर जाण्याचे मनसुबे रचित आहे. आणि आम्ही अजून प्रेमकथा, प्रेमकाव्य, अशा मनोराज्यात वावरत आहोत ! ऐतिहासिक काळांतील शूरमर्दांचे पोवाडे आम्ही रचतो, गातो. ‘ पश्चिम आघाडीवर सामसूम ’ (All quiet on the Westarn Front)

अशा कादंबऱ्या (भाषांतरे करण्यापेक्षा) आपल्या जवानांच्या जीवनावर का लिहिल्या जाऊ नयेत ? ते जीवन जगणाऱ्यांची सुखदुःखे, भावना यांचे दर्शन सामान्य माणसापुढे आले पाहिजे. मानवी हृदये, भावना सर्वत्र सारख्या आहेत. असे म्हटले जाते, पण त्याबरोबरच निरनिराळ्या देशांतील धर्म, संस्कृती, रूढी, वातावरण यांची बंधने त्यांच्यावर असतात. ती विचारात घेऊनच साहित्य निर्मिती झाली पाहिजे. आपल्याकडे तसे आवश्यक तेवढ्या प्रमाणांत होत नाही असे मला वाटते.

प्रश्न १० :– साहित्यिकांकडून तुम्ही कशाची अपेक्षा करता ?

उत्तर :– साहित्यिकांकडून मी फारच मोठ्या अपेक्षा करीत आहे. " सर्व सामान्य माणसासाठी, समाज जीवनाचे, समाज व्यक्तींचे, सत्य दर्शन घडविणारे सुंदर, सुबोध साहित्य सहृदयतेने निर्माण करून, आपण ज्या समाजाचे घटक आहोत त्याचे ऋण यथाशक्ती फेडण्याचा प्रयत्न करावा." समाजाला सुशिक्षित, सुविचारी, सुसंस्कृत, मानवतावादी घडविण्याचे कार्य खराखुरा साहित्यिक करू शकेल, अशी माझी अपेक्षा आहे.

— संपादक 'मित्राक्ष' यांच्या सौजन्याने.

REFBK-0021117
REFBK-0021117
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22-10-1974
29996

(को. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स, अलिबाग)